आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ सप्टेंबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आसाममध्ये १८ हजार ५३० कोटी रुपये खर्चाच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड

- हिंसक कारवायात सहभागी असल्याचा आरोप असलेल्या जहाल नक्षलवाद्याला भामरागड इथून अटक

- जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत महिलांच्या ५७ किलो वजनी गटात भारताच्या जस्मिन लँबोरियानं पटकावलं सुवर्ण पदक

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तानमध्ये सामना होणार

**<><><><>**

भारत जगातला सर्वात वेगानं विकसित होणारा देश असून त्याचप्रमाणे आसाम देखील देशातल्या सर्वात जलद वाढ नोंदवणाऱ्या राज्यांपैकी एक आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज आसाममध्ये दरांग इथं १८ हजार ५३० कोटी रुपयांच्या पायाभूत आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन झालं, त्यावेळी ते बोलत होते. आसामचा विकास जलदगतीनं करण्याचा डबल इंजिन सरकारचा निर्धार आहे, संपूर्ण देश आज विकसित भारताच्या निर्मितीसाठी एकजुटीनं कार्य करत असून त्यात मुख्यत्वे युवावर्गाचं योगदान बहुमोल आहे, असं त्यांनी सांगितलं. ईशान्य भारताच्या विकासावर आपला भर असल्याचं मोदी म्हणाले.

एकविसाव्या शतकातली पहिली २५ वर्ष सरली आहेत आणि यापुढील वर्ष ईशान्य भारताची असतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोणत्याही भागाच्या विकासासाठी संपर्क व्यवस्था उत्तम असणं गरजेचं असून केंद्र सरकार देशभरात कनेक्टिव्हिटी वाढवण्यावर भर देत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><>

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत केंद्र सरकारने आरोग्य क्षेत्राशी संबंधित केलेल्या अनेक सुधारणांमुळे औषधं, वैद्यकीय उपकरणं आणि उपचार अधिक स्वस्त होणार आहेत. या सुधारणांनुसार, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या ३६ जीवरक्षक औषधांवरचा वस्तू आणि सेवा कर शून्य केला असल्यानं उपचारांवरच्या खर्चात मोठी बचत होईल.

या व्यतिरिक्त, गॉझ, बँडेज, रोगनिदान चाचणी संच ग्लुकोमीटर आणि थर्मामीटर यांसारख्या विविध वैद्यकीय उत्पादनांवरील जीएसटीही १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला असल्यानं, नागरिकांना महागड्या उपचारांसाठी आर्थिक तडजोड करावी लागणार नाही. यामुळे वेळेवर आणि योग्य उपचार मिळतील, आणि पर्यायानं नागरिकांचं आरोग्य अधिक सुरक्षित होईल. आरोग्य विमा आणि जीवन विम्याच्या प्रीमियमवरही आता शून्य जीएसटी लागू झाल्यानं प्रीमियमची रक्कमही लक्षणीयरीत्या कमी होईल, त्यामुळे अधिकाधिक लोक विमा संरक्षण घेण्याकडे वळू लागतील.

वस्तू आणि सेवा कराअंतर्गत आरोग्य क्षेत्रासंबंधीच्या या सुधारणा विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मोठा दिलासा देणाऱ्या असून यामुळे आरोग्यविषयक खर्चात मोठी बचत तर होईलच आणि त्याचवेळी आरोग्यसंपन्न भारताची वाटचालही अधिक दृढ होईल अशीच अपेक्षा आहे.

<><><><>

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, हे उद्या महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतील. उद्या सकाळी ११ वा. त्यांचा शपथविधी होईल. या शपथविधी समारंभासाठी त्यांचं आज मुंबईत आगमन झालं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर त्यांचं स्वागत केलं. त्यांना रेल्वे पोलिसांच्या वतीनं आणि त्यानंतर राजभवनात पोहोचल्यावर मुंबई पोलिसांच्या वतीनं मानवंदनाही दिली गेली.

सी.पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपती पदावर निवड झाल्यानंतर ते महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाच्या जबाबदारीतून मुक्त झाले होते. त्यानंतर राष्ट्रपतींनी सध्या गुजरातचे राज्यपाल असलेल्या आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचीही अतिरिक्त जबाबदारी सोपवली होती.

<><><><>

सातारा इथं होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत एकमतानं ही निवड झाल्याचं महामंडळाचे सदस्य प्राध्यापक रामचंद्र काळुंखे यांनी आकाशवाणीला सांगितलं. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असतील. पानिपत, पांगिरा, संभाजी, झाडाझडती यासह अनेक कादंबऱ्याचं लेखन विश्वास पाटील यांनी केलं आहे.

<><><><>

शंकर भिमा महाका या जहाल नक्षलवाद्याला पोलिसांनी भामरागड तालुक्यातल्या तिरकामेटाच्या जंगलातून आज अटक केली. त्याच्यावर हत्या, जाळपोळ, भूसुरुंगस्फोटासह अनेक हिंसक कारवायात सहभागी असल्याचा आरोप आहे.

२१ जानेवारी २०२२ रोजी भामरागड तालुक्यातील डराज-इरपणार मार्गावरल्या पेनगुंडा रस्त्याच्या कामावरल्या १९ वाहनांची जाळपोळ नक्षलवाद्यांनी केली होती. तसंच १५ नोव्हेंबर २०२३ ला लाहेरी इथं एका युवकाची हत्या करण्यात आली होती. या दोन्ही प्रकरणात शंकर महाकाचा शोध राष्ट्रीय तपास यंत्रणा घेत होती, असं पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

<><><><>

ब्रिटनमध्ये लिव्हरपूल इथं झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत, महिलांच्या ५७ किलो वजनी गटात भारताच्या जस्मिन लँबोरियानं सुवर्ण पदक जिंकून इतिहास रचला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची पदक विजेती असलेल्या जस्मिननं अंतिम फेरीत पोलंडच्या जूलिया सेरेमेटाला ४-१ नं पराभूत केलं. भारताच्या महिला खेळाडूंनी या स्पर्धेत उत्तम कामगिरी करत एकूण तीन पदकं जिंकली. ८० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत भारताच्या नुपूर श्योराणला पोलंडच्या अगाता काझ्मार्स्कानं ३-२ असा पराभूत केलं त्यामुळे तिला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं, तर पूजा राणीनं कांस्य पदक पटकावलं. मात्र, पुरुष खेळाडूंना एकही पदक जिंकता आलं नाही.

<><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई इथं आज भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये सामना होणार आहे. रात्री आठ वाजता खेळाला सुरुवात होईल. गेल्या फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत.

दरम्यान, काल रात्री अबुधाबी इथं झालेल्या ब गटाच्या सामन्यात श्रीलंकेनं बांगलादेशावर सहा गडी राखून विजय मिळवला.

**<><><><>**

आशिया चषक महिला हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आज हांगझोऊ इथं भारताचा सामना चीनशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडे पाच वाजता सुरू होईल. या अंतिम सामन्याचा विजेता संघ पुढील वर्षी बेल्जियम आणि नेदरलँड्स इथं होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्र ठरेल.

**<><><><>**

राज्यात अनेक जिल्ह्यांमधे जोरदार पाऊस होत आहे. गेल्या चोवीस तासात मुंबई उपनगर, पालघर, रायगड, बीड आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमधे सर्वाधिक पाऊस झाला. सोलापूरमधे वीज पडून एक जणाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी आहे. नंदुरबारमधे घराची भिंत कोसळून एक जण जखमी झाला आहे.

मराठवाड्यात जायकवाडी धरण ९९ पूर्णांक ३४ टक्के भरलं असून, धरणाचे सर्व २७ दरवाजे साडेचार फूट उंच उघडून पाणी सोडण्यात येत आहे. सध्या गोदावरी नदीपात्रात १ लाख १३ हजार १८४ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी सोडलं जात आहे. त्यामुळे नदीला पूर आला असून नदीकाठच्या अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, सतर्क राहावं, विनाकारण धोकादायक ठिकाणी जाणं टाळावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. बीड जिल्ह्यात गेल्या २४ तासांत एकूण सरासरी ४४ पूर्णांक ४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. एकूण ८६ मंडळांपैकी १६ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद आहे. बीड तालुक्यात नवगण राजुरी, नाळवंडी, चऱ्हाटा, पारगाव सिरस, पाटोदा तालुक्यातील पाटोदा, थेरला, गेवराई तालुक्यातील पिंपळगाव, शिरूर तालुक्यातील शिरूर कासार, तिंतरवणी अशा महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

धाराशिव जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार पावसामुळे नदीनाल्यांना आणि ओढ्यांना पूर आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात बामणी बल्लारशाह इथं वर्धा नदी इशारा पातळीवर वाहत आहे. प्रशासनातर्फे NDRF आणि SDRF पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पुढील २४ तासात रायगड जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज होणार असलेल्या भारत आणि पाकिस्तान सामन्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीनं राज्यभर माझं कुंकू माझा देश हे आंदोलन सुरू केलं आहे. पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीनं मुंबईत करी रोड, शिवाजी पार्क, शिवसेना भवन परिसर, कांजूरमार्गसह ठिकठिकाणी आंदोलन सुरु आहे.

//<><><><>//